| वर्ष - 9 | अंक -35 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

आज पाचवी माळ
कूष्मांडा देवी

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 26 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- भारत- पाकिस्तान फायनलमध्ये भिडणार
- बुमराह भारताच्या माजी खेळाडूवर वैतागला
- परदेशी लोकांना नोकऱ्या का देता?
- दोन नेपाळी नागरिकांना अटक

आता एकच आशा... देवेंद्र फडणवीसांकडून अमित शाहांना पत्र

# अतिवृष्टीने सगळेच संपले!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**महाराष्ट्रात सातत्याने चार दिवसांपासून अतिवृष्टी झाली आहे. यामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीमुळे शेती आणि जनजीवनाचे मोठे नुकसान झाले आहे. हजारो नागरिकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. यामुळे अनेक शेतकरी राज्य सरकारकडून मदतीची मोठी अपेक्षा आहे. या घटनेचं गांभीर्य लक्षात घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. त्यासोबतच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोघांनी केंद्र सरकारला मदतीसाठी पत्र पाठवले आहे.**





केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे मुंबईत एका कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमित शाह यांची भेट घेतली. यावेळी देवेंद्र फडणवीसांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची सही असलेले एक पत्र अमित शाह यांच्याकडे दिले. यावेळी त्यांनी या पत्रातून अतिवृष्टीग्रस्तांसाठी भरघोस मदत मागितली आहे. महाराष्ट्रातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF) मधून भरीव मदत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी या पत्रातून केली आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः ट्विट करत याबाबतची माहिती दिली आहे.

### पत्रात नेमकं काय?

देवेंद्र फडणवीस यांनी अमित शाह यांना पाठवलेल्या निवेदनात महाराष्ट्रातील ३१ हून अधिक जिल्ह्यांमध्ये झालेल्या मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील ३१ हून अधिक जिल्ह्यांमध्ये झालेल्या मुसळधार पाऊस आणि पुरामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. खरीपाच्या अखेरपर्यंत (सप्टेंबर २०२५) पाऊस सुरू असल्याने आत्तापर्यंत ५ दशलक्ष हेक्टरपेक्षा जास्त (सुमारे ५० लाख हेक्टर) शेतीच्या जमिनीचे नुकसान झाले आहे. यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम झाला आहे. राज्य सरकारने आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) मधून २,२१५ कोटी रुपयांची रक्कम वाटप केली आहे. मात्र, आपत्तीचे प्रमाण खूप मोठे असल्याने आणि हवामानाचा अंदाज पाहता परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रात झालेली अतिवृष्टी आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान याबाबत एक सविस्तर निवेदन आज आमचे नेते, देशाचे गृहमंत्री मा. अमितभाई शाह यांना दिले. एनडीआरएफमधून भरीव मदत महाराष्ट्रातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी देण्यात यावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात...

या मोठ्या नुकसानीसाठी SDRF अंतर्गत राज्याची संसाधने अपुरी पडत आहेत. त्यामुळे, शेतकरी आणि नागरिकांना सावरण्यासाठी केंद्र सरकारने NDRF मधून तातडीने अतिरिक्त निधी द्यावा. या निधीतून पीक नुकसान भरपाई, उपजीविकेसाठी आधार, पशुधनाचे नुकसान आणि मालमत्तेची पुनर्बांधणी करण्यासाठी मदत करणे शक्य होईल, असे मुख्यमंत्र्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. त्यासोबतच पूरग्रस्त शेती जमिनीबाबतचा सविस्तर प्रस्ताव लवकरच केंद्राला सादर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे आता केंद्राकडून राज्य सरकारला मदत दिली जाणार का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### केंद्राकडे मागितली जाणार मदत

दरम्यान, शेतकरी, स्थानिक लोकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे, असे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. त्यामुळे सरकारनेही महाराष्ट्रात शेतकरी हवालदील झाल्याचे मान्य केले आहे. सरकारकडून मदतीचे निकष बाजूला ठेवून मदत दिली जाईल, असेही सांगितले जात आहे. राज्यातील नुकसान मोठे असल्यामुळे आता राज्य सरकार केंद्र सरकारला पत्र लिहून मोठ्या आर्थिक मदतीची मागणी करणार आहे. त्यामुळे आता केंद्र सरकार राज्याला नेमके किती रुपये देणार? राज्य सरकार नेमकी किती आणि कशी मदत करणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

‘एससीईआरटी’ने दिल्या सूचना

## १० ते १३ ऑक्टोबर या कालावधीत संकलित चाचणी

# शाळास्तरावरच्या परीक्षांचे काय?

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील इयत्ता दुसरी ते आठवीसाठी भाषा, गणित व इंग्रजी (तृतीय भाषा) वगळून इतर सर्व विषयांची संकलित चाचणी १ लेखी, तोंडी, स्वाध्याय, प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार शाळास्तरावर घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, कोणत्याही शाळेत भाषा, गणित व इंग्रजी (तृतीय भाषा) या विषयांची दुबार संकलित चाचणी १ होणार नाही, असे राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) स्पष्ट केले आहे.**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या सहसंचालक डॉ. कमलादेवी आवटे यांनी याबाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन चाचणी १, संकलित मूल्यमापन चाचणी २ अशा तीन नियतकालिक चाचण्यांचे नियोजन करण्यात येत आहे. त्यानुसार १० ते १३ ऑक्टोबर या कालावधीत संकलित चाचणी १ आयोजित करण्यात आली आहे. या चाचणीअंतर्गत प्रथम भाषा, गणित व तृतीय भाषा (इंग्रजी) या विषयांच्या इयत्ता दुसरी ते आठवीतील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व शाळा, खासगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांची चाचणी एकूण दहा माध्यमांत घेण्यात येणार आहे. या चाचणीसाठीच्या प्रश्नपत्रिका राज्यस्तरावरून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे पुरवण्यात येणार आहेत.डॉ. आवटे म्हणाल्या, ‘गणित, भाषा, इंग्रजी (तृतीय भाषा) या विषयांचा संकलित चाचणी १मध्ये समावेश आहे. त्यामुळे शाळास्तरावर या विषयांची स्वतंत्र परीक्षा घेण्याची आवश्यकता नाही. हे विषय वगळून अन्य विषयांची शाळास्तरावर परीक्षा घेता येईल. संकलित चाचणीच्या वेळापत्रकाच्या पत्रात या सूचनेचा उल्लेख राहून गेल्याने स्वतंत्र परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.’नियतकालिक मूल्यांकन चाचणीच्या प्रश्नपत्रिका शाळांना अपुऱ्या पडत असल्याचे दिसून येते. अशा वेळी परीक्षा रद्द करणे किंवा छायांकित प्रती काढण्याची वेळ आली आहे. मात्र, आता मागणीप्रमाणे प्रश्नपत्रिका उपलब्ध न झाल्यास छायांकित प्रती काढण्यास बंदी करण्यात आली आहे. त्यामुळे शाळांना प्रश्नपत्रिकांचा अपुरा पुरवठा झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी. प्रश्नपत्रिकांबाबत प्रशासनाने प्रत्येक शाळेची त्यांच्या दप्तरी नोंद असलेली संख्या जाहीर करावी, ती संख्या योग्य-अयोग्य असल्याबाबत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने योग्य त्या पुराव्यासह दुरुस्ती करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. तरच अपुऱ्या प्रश्नपत्रिकांचा घोळ मिटेल,’ असे मत माजी मुख्याध्यापक महेंद्र गणपुले यांनी व्यक्त केले. राज्यातील इयत्ता दुसरी ते आठवीसाठी भाषा, गणित व इंग्रजी (तृतीय भाषा) वगळून इतर सर्व विषयांची संकलित चाचणी १ लेखी, तोंडी, स्वाध्याय, प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार शाळास्तरावर घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, कोणत्याही शाळेत भाषा, गणित व इंग्रजी (तृतीय भाषा) या विषयांची दुबार संकलित चाचणी १ होणार नाही, असे राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) स्पष्ट केले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व डॉ. कमलादेवी आवटे यांनी याबाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत.

### जबाबदारी निश्चित करावी



### चाचणी एकूण दहा माध्यमांत

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन चाचणी १, संकलित मूल्यमापन चाचणी २ अशा तीन नियतकालिक चाचण्यांचे नियोजन करण्यात येत आहे. या चाचणीअंतर्गत प्रथम भाषा, गणित व तृतीय भाषा (इंग्रजी) या विषयांच्या इयत्ता दुसरी ते आठवीतील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व शाळा, खासगीशाळांतील विद्यार्थ्यांची चाचणी एकूण दहा माध्यमांत घेण्यात येणार आहे.

# मेट्रोच्या कामामुळे जलवाहिनीला गळती

## पिंपरी-चिंचवडमधील पाणीपुरवठा विस्कळीत

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी परिसरात मेट्रोचे काम सुरू असताना महापालिकेच्या पंपिंग झोनला पाणीपुरवठा करणाऱ्या १२०० मिलीमीटर व्यासाच्या मुख्य जलवाहिनीला अचानक धक्का लागून पाणीगळती सुरू झाली. दुरुस्तीचे काम हाती घेतले असून आज गुरुवारी (२५ सप्टेंबर) दिवसभर पाणीपुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.**



ही गळती रोखण्याचे काम महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून युद्धपातळीवर करण्यात येत आहे. गळती रोखण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. हे काम तातडीने पूर्ण करून शुक्रवारी (२६ सप्टेंबर) सकाळपर्यंत पाणीपुरवठा पूर्ववत करण्याचा पाणीपुरवठा विभागाचा प्रयत्न आहे. या कामामुळे चिखली, तळवडे, नेहरूनगर, संत तुकारामनगर, महेशनगर, कुदळवाडी, शाहूनगर, अजंठानगर, म्हेत्रेवस्ती, त्रिवेणीनगर, जाधववाडी, बोऱ्हाडेवाडी आदी भागांतील पाणीपुरवठा गुरुवारी (२५ सप्टेंबर) दिवसभर बंद राहणार आहे. नागरिकांनी उपलब्ध पाणी जपून वापरावे, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.जलवाहिनी दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असून पाणीपुरवठा लवकरात लवकर नियमित करण्यासाठी पाणीपुरवठा विभाग प्रयत्नशील असल्याचे पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.शहराला मावळातील पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. पवना नदीवर रावेत बंधाऱ्यावरुन पाणी उचलून जलवाहिनीद्वारे निगडीत आणले.

### सहा दिवसाआड पाणीपुरवठा

हे पाणी धरणातून इंद्रायणी नदीत सोडले जाते. नदीवरील निघोजे बंधाऱ्यातून महापालिका अशुद्ध पाणी उचलते. तेथून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रात पाणी आणले जाते. तिथे पाण्यावर प्रक्रिया करुन जलवाहिनीद्वारे जलकुंभात (टाक्या) पाणी सोडले जाते. . पवना धरणातून ५५० दशलक्ष लीटर,आंद्रा धरणातून ८० दशलक्ष लीटर आणि एमआयडीसीकडून २० दशलक्ष लीटर पाणी उचलले जाते.

**मेट्रोचे काम सुरू** नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन

# निगडी येथे जलवाहिनी फुटली; हजारो लिटर पाणी वाया


## पाणीपुरवठा विभागाकडून गळती रोखण्याचे काम युद्धपातळीवर


**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड शहरातील निगडी येथे मेट्रोचे काम सुरू असताना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पंपिंग झोनला पाणीपुरवठा करणाऱ्या १२०० मिलीमीटर व्यासाच्या मुख्य जलवाहिनीला अचानक धक्का लागून पाणीगळती सुरू झाली. यामुळे हजारो लिटर पाणी वाया गेले. ही गळती रोखण्याचे काम महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून युद्धपातळीवर करण्यात येत आहे. या भागातील नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन करण्यात येत आहे.**

गळती रोखण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. हे काम तातडीने पूर्ण करून उद्या (२६ सप्टेंबर) सकाळपर्यंत पाणीपुरवठा पूर्ववत करण्याचा पाणीपुरवठा विभागाचा प्रयत्न आहे. या कामामुळे चिखली, तळवडे, नेहरूनगर, संत तुकारामनगर, महेशनगर, कुदळवाडी, शाहूनगर, अजंठानगर, म्हेत्रेवस्ती, त्रिवेणीनगर, जाधववाडी, बोऱ्हाडेवाडी आदी भागांतील पाणीपुरवठा आज (२५ सप्टेंबर) दिवसभर बंद राहणार आहे. तरी नागरिकांनी उपलब्ध पाणी जपून वापरावे, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

> जलवाहिनी दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असून पाणीपुरवठा लवकरात लवकर नियमित करण्यासाठी पाणीपुरवठा विभाग प्रयत्नशील आहे. नागरिकांनी पाणी जपून वापरावे.
>
> **- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका**





# दोन हजारांहून अधिक नागरिकांनी घेतली स्वच्छतेची शपथ

## शहर स्वच्छ ठेवण्याचा केला संकल्प; स्वच्छता मोहिमेत 12 टन कचरा गोळा

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या "श्रमदान एक दिवस – एक तास – एक साथ" या उपक्रमाने निगडीतील भक्ती शक्ती चौकात स्वच्छतेचा महाउत्सव आज नागरिकांनी अनुभवला. सकाळच्या प्रसन्न वातावरणात "स्वच्छतेची शपथ" घेत दोन हजारांहून अधिक नागरिकांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. भक्ती शक्ती चौकातून ट्रान्सपोर्ट नगरी चौक, देहूरोड चौक, अंकुश चौक, पिंपरी चौक, आकुर्डी चौक याठिकाणी जाणाऱ्या रस्त्यांवर स्वच्छता मोहिम राबवत जवळपास १२ टन कचरा गोळा करण्यात आला. आमदार उमा खापरे आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते या मोहिमेचा शुभारंभ झाला.**




याप्रसंगी महापालिका अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपायुक्त सचिन पवार, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, अतुल पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, महेश आढाव, शांताराम माने, तानाजी दाते, कुंडलिक दरवडे, अंकुश झिटे, राजेश भाट, सुधीर वाघमारे, माजी नगरसदस्य सचिन चिखले, नारायण बहिरवाडे, त्रिपुरा राज्यातील आगरतळा महापालिकेचे सहाय्यक आयुक्त अमित कर्माकर, सहाय्यक लेखाधिकारी बलई चंद्रदास, उप प्रकल्प समन्वय अधिकारी सुरोजित दास, वित्त व्यवस्थापन अधिकारी पवन पारीक, सामाजिक संरक्षक अधिकारी रेखा दुबे यांच्यासह रुपीनगर ज्येष्ठ नागरिक संघ, महेंद्र लॉजिस्टिक्स अशा विविध संस्थांचे प्रतिनिधी, पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अमृता विद्यालय, मॉडर्न कॉलेज, सायरस पुनावाला स्कूल, शिशुविहार विद्यालय, प्रा. रामकृष्ण मोरे विद्यालय, पीसीईटी कॉलेज अशा विविध शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह यावेळी म्हणाले की, स्वच्छता सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये पिंपरी चिंचवड शहराने राज्यात प्रथम तर देशात सातवा क्रमांक मिळवला आहे. यामध्ये खऱ्या अर्थाने योगदान हे आपल्या सफाई मित्रांचे आहे. शहरामध्ये दैनंदिन स्वच्छता राहावी, यासाठी महापालिकेचे सफाई कर्मचारी अहोरात्र कार्यरत असतात. आता स्वच्छता सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये आपल्याला देशात अग्रेसर यायचे आहे. त्या अनुषंगाने महापालिका विविध उपक्रम राबवत असून नागरिक देखील या उपक्रमांमध्ये सहभागी होत आहेत. आज "श्रमदान एक दिवस – एक तास – एक साथ" या उपक्रमाला शाळकरी विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून आपले पिंपरी चिंचवड देशात स्वच्छतेच्या बाबतीत अग्रेसर येण्यासाठी नागरिकांचे असेच सहकार्य भविष्यातही कायम राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# दिएगो गार्सिया बेट पुन्हा चर्चेत



### भूमिका

**हिंद महासागरात दिएगो गार्सिया हे एक महत्त्वाचे बेट आहे. ते विविध कारणांमुळे सतत चर्चेत असते. भारतापासून फार लांब नसलेल्या या बेटावर अमेरिकेचा लष्करी तळ आहे. त्याला सामरिक महत्त्व आहे. अलीकडे चीनच्या नौदलाची जहाजे तिथे मोठ्या प्रमाणात दिसू लागली आहेत. त्यामुळेदेखील अमेरिकासाठी हे बेट महत्त्वाचे आहे. भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीनेही दिएगो गार्सियाला महत्व आहे.**

१९७१ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धातही दिएगो गार्सिया चर्चेत असे. आता ३ ऑक्टोबरला ब्रिटन आणि मॉरिशसमध्ये झालेल्या एका सामंजस्य करारामुळे दिएगो गार्सिया पुन्हा चर्चेत आले आहे. अनेक वर्षांचा वाद आणि दोन वर्षांच्या वाटाघाटींनंतर चागोस द्वीपसमूहाबद्दल दोन्ही राष्ट्रांत हा करार झाला आहे. जवळपास ६० बेटांच्या या द्वीपसमूहात सर्वात मोठा आहे दिएगो गार्सिया. या बेटावरच लोक राहतात. या करारामुळे ब्रिटनने चागोस द्वीपसमुहावर पूर्व आफ्रिकेच्या मॉरिशस या देशाचा सार्वभौम अधिकार असल्याचे मान्य केले आहे. पण, दिएगो गार्सियावर ब्रिटनचे नियंत्रण राहणार आहे. १९६८ मध्ये ब्रिटनच्या ताब्यातून मॉरिशस स्वतंत्र झाला. पण, त्यापूर्वी ब्रिटनने १९६५ मध्ये चागोस द्वीपसमूहाला मॉरिशसपासून वेगळे करून ब्रिटिश इंडियन ओशन टेरिटरी असे नाव दिले. चागोसवर मॉरिशसचा



सार्वभौम अधिकार असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने २०१९ आणि २०२१ मध्ये मान्य केले. तर आंतरराष्ट्रीय न्यायालयाने (आयसीजे) २०२२ मध्ये मॉरिशसचे म्हणणे मान्य केले. सुरुवातीला ब्रिटनला संयुक्त राष्ट्रांचे मत आणि आयसीजेचा निकाल मान्य नव्हता. आयसीजेने मात्र सल्ला दिला असल्याचे ब्रिटनचे म्हणणे होते. ब्रिटन आणि मॉरिशसने चागोस द्वीपसमुहावर मॉरिशसचे संपूर्ण सार्वभौमत्व राहील, असे एका संयुक्त-निवेदनातून जाहीर केले आहे. हा एक ऐतिहासिक राजकीय सामंजस्य करार असल्याचे उभय देशांनी म्हटले आहे. यापुढे ९९ वर्षे अमेरिकेचा लष्करी तळ दिएगो गार्सिया येथे कायम राहील, हेदेखील स्पष्ट झाले आहे. यातूनही दिएगो गार्सियाचे सामरिक महत्त्व लक्षात येते. भारताने या कराराचे स्वागत केले आहे. अनेक वर्षांपासून चागोस द्वीपसमुह मॉरिशसला परत करण्यात यावा, ही भारताची भूमिका आहे. १९६० च्या सुमारास चागोस येथे राहणाऱ्या काही लोकांनी मात्र या करारावर टीका केली आहे. नुकसान भरपाई देण्यात यावी आणि चागोस येथे परत जाण्याचा अधिकार मिळावा, अशी त्यांची मागणी आहे. वाटाघाटीत आपल्याला सहभागी करून घेतले नाही, याविषयी त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.युरोपीय येण्यापूर्वी हिंद महासागरातील चागोस द्वीपसमूहावर कोणीगी राहत नव्हते. १५१२ मध्ये पोर्तुगीजांनी दिएगो गार्सियाचा शोध लावला. फ्रेंच आणि नंतर ब्रिटिश तिथे आले. फ्रेंचांनी १७१५ मध्ये चागोस कब्जात घेतले. तोपर्यंत तिथे कोणी राहत नव्हते. ब्रिटनने १८१४ मध्ये चागोस द्वीपसमूहावर कब्जा केला. या द्वीपसमुहाचे महत्त्व लक्षात आल्यावर ब्रिटनने आफ्रिका आणि भारतातून मजूर आणले. मोठ्या प्रमाणात नारळाच्या झाडांची लागवड करण्यात आली. नारळातून लोकांना पैसे मिळायला लागले. या व्यतिरिक्त मासे पकडण्याचा व्यवसाय सुरू झाला. वस्तीदेखील हळूहळू वाढत होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला ही वस्ती १,००० हून अधिक झाली. सामरिक महत्वामुळे अमेरिकेच्या विनंतीवरून ब्रिटनने येथील १,५०० हून अधिक लोकांच्या स्थलांतरास सुरुवात केली. १९६७ ते १९७३ दरम्यान या लोकांना बळजबरीने मॉरिशस आणि सेशेल्स येथे पाठविण्यात आले. यादरम्यान, ब्रिटनने मॉरिशसला स्वातंत्र्य दिले. ब्रिटनने अतिशय हुशारीने ही हकालपट्टी केली होती. सुरुवातीला काही कामासाठी मॉरिशस किंवा सेशेल्स किंवा इतरत्र गेलेल्या लोकांना परत द्विपसमूहात येऊ दिले नाही. त्यानंतर बाहेरून येणाऱ्या वस्तू बऱ्याच मर्यादित करण्यात आल्या.१९७३ पर्यंत मॉरिशस येथे जवळपास १,५०० लोकांचे आणि सेशेल्स येथे २३२ लोकांचे पुनर्वसन करण्यात आले.ब्रिटनने १९६६ मध्ये अमेरिकेला दिएगो गार्सिया ५० वर्षासाठी दिले. नंतर २० वर्षे वाढवण्याचीही त्यात तरतुद होती. तेव्हापासून अमेरिकेने तिथे हळूहळू लष्करी तळ उभारला. आज तिथे अंदाजे २,५०० कर्मचारी काम करत आहेत. ते प्रामुख्याने अमेरिकन आणि ब्रिटिश आहेत.

## संपादकीय »

### भ्रष्ट करिता सायास

***"सरकारी मालकीची साधनसंपत्ती यापुढे लिलावातूनच विका" अशा अर्थाचा दंडक सर्वोच्च न्यायालयाने घालून दिला; तो पाळण्यात विद्यामान सत्ताधारी भाजपस रस नाही...***

मनमोहन सिंग सरकारातील दूरसंचारमंत्री ए. राजा हे त्यातील मुख्य आरोपी. हा 'घोटाळा' (?) कसा झाला हे आठवणे आता मनोरंजक ठरेल. याचे कारण दूरसंचारातील ज्या निर्णयांमुळे भ्रष्टाचार झाला असे तत्कालीन विरोधी पक्ष भाजपस त्या वेळी वाटले तोच मार्ग सत्ताधारी असलेल्या भाजपने दूरसंचारासाठी आत्ता निवडलेला असून त्या वेळी ज्या मार्गास खासगी कंपन्यांचा विरोध होता तोच मार्ग आता खासगी कंपन्यांस हवाहवासा वाटू लागला आहे. दूरसंचार क्षेत्रातील या बदलत्या कंपनलहरी समजून घेणे आवश्यक. 'त्या'वेळी दूरसंचारात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप भाजपने केला कारण तत्कालीन दूरसंचारमंत्री राजा यांनी दूरसंचारासाठीची आवश्यक कंपनलहरींची (स्पेक्ट्रम) कंत्राटे प्रशासकीय अधिकारात दिली. त्यांचा लिलाव केला नाही.

पावसाळा संपला की धूळ, मग धूर, हिवाळ्यात धूरमिश्रित धुके किंवा 'धुरके' यांचे साम्राज्य पसरू लागते, मग हवा-प्रदूषणाबद्दल पुन्हा चर्चा सुरू होते! तज्ज्ञांनी सुचविलेल्या उपायांची प्रचंड संख्या असूनही, परिस्थिती तशीच राहाते. वास्तविक समस्या काय आहे ते सर्वांना नीट माहीत आहेच.

# प्रदूषणाच्या बळींची आकडेवारी उपलब्ध व्हावी...

तरीही, हवा-प्रदूषणाचा आरोग्यावर होणारा परिणाम रोखण्यासाठी उपाय शोधणे सोपे नाही, असेच वारंवार, वर्षानुवर्षे का होते आहे?'मोठ्या शहरांतील सुमारे सात टक्के मृत्यू हे हवा-प्रदूषणामुळे होतात हे खरे आहे काय? असल्यास, हे अपमृत्यू रोखण्यासाठी सरकार कोणते उपाय योजणार आहे?' अशा आशयाचा प्रश्न जुलैमध्ये राज्यसभेत विचारला गेला होता. त्यावर 'एनडीए' सरकारमध्ये आरोग्य व कुटुंबकल्याण खात्याच्या राज्यमंत्री असलेल्या अनुप्रिया पटेल यांनी दिलेले उत्तर असे की, 'हवा प्रदूषण आणि मोठ्या शहरांतील मृत्यू यांचा थेट संबंध प्रस्थापित करू शकणारी आकडेवारी उपलब्ध नाही'... मात्र याच प्रश्नातल्या पुढल्या भागाचा आधार घेऊन, हवा-प्रदूषण रोखण्यासाठी हे सरकार कसे कटिबद्ध आहे, हे सांगताना हवा-प्रदूषण रोखण्यासाठी सरकारने सुरू केलेल्या उपक्रमांची माहिती राज्यमंत्री पटेल यांनी दिली. अशाच प्रकारची उत्तरे



आपण यापूर्वीही ऐकलेली आहेत... मग ती कोविडबळींची संख्या असो की कुपोषणबळींची... सरकारकडे नेमका आकडा नसतोच आणि तरीही सरकार कटिबद्ध असतेच.पण हवा-प्रदूषणाने जाणाऱ्या 'सात टक्के' बळींविषयीच्या उत्तरात आणखीही एक गोम आहे. ती चलाखी सहजासहजी नाकारताही येत नाही, ही तिची खासियत. ती अशी की, मरणाशी 'थेट संबंधा'वर भर द्यायचा आणि 'थेट संबंध' नाकारायचा! समुद्रात बुडून अथवा अपघातात जीव जातो तेव्हा थेट संबंध जोडण्याशिवाय पर्यायच नसतो, पण हवा-प्रदूषणाचे बळी हे कदाचित त्यांना सिगारेट/दारूसारखी व्यसने असल्याने, किंवा त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयी योग्य नसल्याने, किंवा आनुवंशिक दोषांमुळेच, कामावरल्या तणावामुळेच किंवा हृदयविकार/कर्करोग आदींमुळेही गेले असतील, असे म्हणता येते. यावत तज्ज्ञांकडे काही उततर आहे का?आहे. अत्यंत तार्किक असे ते उत्तर आहे. प्रकृतीवर हळुहळू किंवा कालान्तराने परिणाम घडवत मृत्यूकडे ढकलणारे कोणतेही कारण हे अन्य कारणांशीही जोडलेले असू शकते, असा तो तर्क. परंतु अन्य कारणे (व्यसनांपासून ते विकारांपर्यंत) समान असूनही विशिष्ट कारण अधिक घातक ठरते की नाही, हे महत्त्वाचे. तज्ज्ञांचे हे उत्तर अन्य संदर्भात मान्यही झालेले आहे. उदाहरणार्थ, तंबाखू हे कर्करोगाचे एकमेव कारण असू शकत नाही, यासारखे युक्तिवाद न करता 'तंबाखू सेवन कर्करोगाचे कारण' हा तंबाखूयुक्त व्यसनपदार्थांच्या आवरणांवर असलेला संदेश जनजाागृतीसाठी आहे, हे मान्य केले जाते. अशा संदेशांची गरज आहे, हेही समाजमान्य असते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

आरक्षणावरून जुंपली? त्यांना करायचं आहे ते करू द्या : छगन भुजबळ

# पवारांच्या भूमिकेला कट्टर विरोध

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्याला त्याला आर्थिक परिस्थितीनुसार आरक्षण मिळावं”, अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली होती. मात्र, अजित पवारांच्या या भूमिकेला त्यांच्याच पक्षातून विरोध होऊ लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) वरिष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ म्हणाले, “अजित पवारांच्या भूमिकेला आमचा विरोध आहे.” आर्थिक व शैक्षणिकपेक्षा सामाजिक मागास असणं हा आरक्षणाचा प्रमुख निकष असल्याचं त्यांनी नमूद केलं. “जे सामाजिकरित्या मागास आहेत त्यांनाच आरक्षण मिळालं पाहिजे”, अशी रोखठोक भूमिका भुजबळ यांनी घेतली आहे. तसेच अजित पवारांच्या भूमिकेचा आम्ही विरोध करू असंही त्यांनी म्हटलं आहे.**

## आमची भूमिका ही कट्टर विरोधाची



छगन भुजबळ म्हणाले, “ठीक आहे, अजित पवारांना करायचं आहे ते करू द्या. परंतु, आमचा त्यांच्या भूमिकेला कट्टर विरोध आहे. आमची भूमिका ही कट्टर विरोधाची आहे. कारण आरक्षणाचं मूळ सामाजिक मागसलेपणात आहे. आर्थिक किंवा शैक्षणिक हे देखील निकष असले तरी सामाजिक मागास असणं आवश्यक आहे. सामाजिकरित्या मागास असणं हा पहिल्या क्रमांकाचा निकष आहे. त्यामुळे जे समाजिकरित्या मागास असतील त्यांनाच आरक्षण मिळालं पाहिजे.”उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले होते की “छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करताना अठरापगड जातीच्या लोकांना, बारा बलुतेदारांना आपल्याबरोबर घेतलं. त्याच शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा विचार घेऊन आपण पुढे गेलो तरच आपलं भलं होईल ही गोष्ट कृपा करून लक्षात घ्या. त्यामुळे कोणी जातीपातीच्या राजकारणात पडू नका. कोणी काही चुकीचं खूळ डोक्यात घालण्याचा प्रयत्न केला तर त्याला सांगा आपण सगळी हाडामासाची माणसं आहोत, सगळ्यांचं रक्त लाल आहे, जातीच्या भानगडीत पडू नको. जातीबद्दल बोलायचं झाल्यास प्रत्येकाला आदर मिळायला हवा. ज्याच्या त्याच्या मागणीप्रमाणे, त्यांच्या आर्थिक परिस्थितीप्रमाणे आरक्षण मिळायला हवं. परंतु, यात कोणी राजकारण करत असेल तर त्याला आवर घालायला पाहिजे.”अजित पवार म्हणाले, “मित्रांनो जातीपातीचा, नात्यागोत्याचा विचार करू नका, मी राजकारण करत असताना कधीच कोणाची जात-पात, नातंगोतं बघितलं नाही, बघत नाही. मी केवळ माणूस बघतो आणि त्याची मदत करतो.”छगन भुजबळ म्हणाले, “ठीक आहे, अजित पवारांना करायचं आहे ते करू द्या. परंतु, आमचा त्यांच्या भूमिकेला कट्टर विरोध आहे. आमची भूमिका ही कट्टर विरोधाची आहे. कारण आरक्षणाचं मूळ सामाजिक मागसलेपणात आहे. आर्थिक किंवा शैक्षणिक हे देखील निकष असले तरी सामाजिक मागास असणं आवश्यक आहे. सामाजिकरित्या मागास असणं हा पहिल्या क्रमांकाचा निकष आहे. त्यामुळे जे समाजिकरित्या मागास असतील त्यांनाच आरक्षण मिळालं पाहिजे.”उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले होते की “छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करताना अठरापगड जातीच्या लोकांना, बारा बलुतेदारांना आपल्याबरोबर घेतलं. त्याच शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा विचार घेऊन आपण पुढे गेलो तरच आपलं भलं होईल ही गोष्ट कृपा करून लक्षात घ्या. त्यामुळे कोणी जातीपातीच्या राजकारणात पडू नका. कोणी काही चुकीचं खूळ डोक्यात घालण्याचा प्रयत्न केला तर त्याला सांगा आपण सगळी हाडामासाची माणसं आहोत, सगळ्यांचं रक्त लाल आहे, जातीबद्दल बोलायचं झाल्यास प्रत्येकाला आदर मिळायला हवा. ज्याच्या त्याच्या मागणीप्रमाणे, त्यांच्या आर्थिक परिस्थितीप्रमाणे आरक्षण मिळायला हवं.

## पवार काय म्हणाले होते?

परंतु, यात कोणी राजकारण करत असेल तर त्याला आवर घालायला पाहिजे.”अजित पवार म्हणाले, “मित्रांनो जातीपातीचा, नात्यागोत्याचा विचार करू नका, मी राजकारण करत असताना कधीच कोणाची जात-पात, नातंगोतं बघितलं नाही, बघत नाही. मी केवळ माणूस बघतो आणि त्याची मदत करतो.”छगन भुजबळ म्हणाले, “ठीक आहे, अजित पवारांना करायचं आहे ते करू द्या. परंतु, आमचा त्यांच्या भूमिकेला कट्टर विरोध आहे.

# शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत मिळावी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अमित शहांकडे मागणी

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी भरीव आर्थिक मदत राष्ट्रीय आपत्ती निवारण निधातून (एनडीआरएफ) मिळावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केली.**



शहा हे एका कार्यक्रमासाठी गुरूवारी मुंबईत आले होते. फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार अशा तिघांच्या स्वाक्षरीने शहा यांना मदतीचे निवेदन दिले.राज्यातील ३१ जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाली असून सुमारे ५० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना राज्य अपत्ती निवारण निधातून (एसडीआरएफ) दोन हजार २१५ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पाऊस आणखी काही दिवस सुरू राहणार आहे.

त्यामुळे पिकांची हानी मोठ्या प्रमाणावर होत असून राज्याच्या धान्योत्पादनावरही परिणाम होणार आहे.अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांची संख्या मोठी असून त्यांच्या पिकाचेच नव्हे, तर पशुधन, घरदार व अन्य नुकसानही झाले आहे. या मोठ्या आपत्तीच्या काळात शेतकरी व अन्य नागरिकांच्या मदतीसाठी राज्य आपत्ती निवारण निधी पुरेसा नाही. साधनसामग्रीची कमतरता आहे.

## पाऊस आणखी काही दिवस सुरू

केंद्र सरकारने एनडीआरएफच्या माध्यमातून भरीव मदत द्यावी, अशी मागणी फडणवीस यांनी शहा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.शहा हे एका कार्यक्रमासाठी गुरूवारी मुंबईत आले होते. फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार अशा तिघांच्या स्वाक्षरीने शहा यांना मदतीचे निवेदन दिले.राज्यातील ३१ जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाली असून सुमारे ५० लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना राज्य अपत्ती निवारण निधातून (एसडीआरएफ) दोन हजार २१५ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पाऊस आणखी काही दिवस सुरू राहणार आहे.


**कबर हटवण्याची मागणी** Amazon, Apple सह दहा टेक कंपन्यांना पत्र

# परदेशी लोकांना नोकऱ्या का देता?

## कॉर्पोरेट हेरगिरीचा धोका आहे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पक्षाचे सिनेटर चक ग्रासली यांनी ॲमेझॉन, ॲपल आणि जेपी मॉर्गनसह दहा मोठ्या अमेरिकन टेक कंपन्यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी या कंपन्यांना, "तुम्ही एच-१बी व्हिसा धारक परदेशी कर्मचाऱ्यांना का नोकऱ्या देत आहात?", असा प्रश्न विचारला आहे.**




याचबरोबर या अमेरिकन कंपन्यांमध्ये किती एच-१बी व्हिसा धारक परदेशी कर्मचारी आहेत, त्यांना किती वेतन दिले जाते आणि परदेशी लोकांना नोकऱ्या दिल्याने अमेरिकन कर्मचाऱ्यांना नोकरी मिळवण्याची संधी कमी झाली आहे का, असेही विचारले आहे.सर्व स्थानिक अमेरिकन प्रतिभावान कर्मचारी बाजूला पडल्याने, आम्हाला विश्वास ठेवणे कठीण जात आहे की ॲमेझॉनला या पदांसाठी पात्र अमेरिकन कर्मचारी मिळत नाहीत", असे सिनेटर चक ग्रासली यांनी ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जॅसी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. ग्रासली यांनी सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, ते मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांचा आढावा घेणार आहेत. तसेच त्यांनी सांगितले की, अमेरिकेतील विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित पदवीधरांना बेरोजगारीचा सामना करावा लागत आहे. तुम्हाला माहित आहे का, आता अमेरिकेतील विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित पदवीधरांना बेरोजगारीचा जास्त सामना करावा लागतो? कदाचित मोठ्या टेक कंपन्या हजारो परदेशी कर्मचाऱ्यांना नोकऱ्या देण्यासाठी अमेरिकन कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकत आहेत", असे चक ग्रासली म्हणाले.

डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने एच-१बी व्हिसा शुल्क १ लाख डॉलर्सपर्यंत वाढवल्यानंतर चक ग्रासली यांनी हे पाऊल उचलले आहे.

ग्रासली यांनी अलीकडेच होमलँड सिक्युरिटी विभागाला परदेशी विद्यार्थ्यांना अमेरिकेत नोकरी करण्याची परवानगी देणे थांबवण्याची विनंती केली होती.परदेशी विद्यार्थ्यांना अमेरिकेत काम करायला मिळत असल्याने अमेरिकेला तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट हेरगिरीचा धोका आहे, असे ग्रासली यांनी सूचित केले.होमलँड सिक्युरिटी विभागाने अमेरिकन लोकांशी स्पर्धा करणाऱ्या विद्यार्थी व्हिसा धारकांना कामाचे अधिकार देणे थांबवावे लागेल. हे कायद्याचे थेट उल्लंघन आहे. यामुळे अमेरिकेला तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट हेरगिरीचा धोका आहे," असे ग्रासली यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.याचबरोबर या अमेरिकन कंपन्यांमध्ये किती एच-१बी व्हिसा धारक परदेशी कर्मचारी आहेत, त्यांना किती वेतन दिले जाते आणि परदेशी लोकांना नोकऱ्या दिल्याने अमेरिकन कर्मचाऱ्यांना नोकरी मिळवण्याची संधी कमी झाली आहे का, असेही विचारले आहे.सर्व स्थानिक अमेरिकन प्रतिभावान कर्मचारी बाजूला पडल्याने, आम्हाला विश्वास ठेवणे कठीण जात आहे की ॲमेझॉनला या पदांसाठी पात्र अमेरिकन कर्मचारी मिळत नाहीत", असे सिनेटर चक ग्रासली यांनी ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँडी जॅसी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.ग्रासली यांनी सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, ते मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांचा आढावा घेणार आहेत. तसेच त्यांनी सांगितले की, अमेरिकेतील विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित पदवीधरांना बेरोजगारीचा सामना करावा लागत आहे.तुम्हाला माहित आहे का, आता अमेरिकेतील विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित पदवीधरांना बेरोजगारीचा जास्त सामना करावा लागतो? कदाचित मोठ्या टेक कंपन्या हजारो परदेशी कर्मचाऱ्यांना नोकऱ्या देण्यासाठी अमेरिकन कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकत आहेत", असे चक ग्रासली म्हणाले. डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने एच-१बी व्हिसा शुल्क १ लाख डॉलर्सपर्यंत वाढवल्यानंतर चक ग्रासली यांनी हे पाऊल उचलले आहे.

### नोकरी मिळवण्याची संधी कमी

ग्रासली यांनी अलीकडेच होमलँड सिक्युरिटी विभागाला परदेशी विद्यार्थ्यांना अमेरिकेत नोकरी करण्याची परवानगी देणे थांबवण्याची विनंती केली होती.परदेशी विद्यार्थ्यांना अमेरिकेत काम करायला मिळत असल्याने अमेरिकेला तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट हेरगिरीचा धोका आहे, असे ग्रासली यांनी सूचित केले.होमलँड सिक्युरिटी विभागाने अमेरिकन लोकांशी स्पर्धा करणाऱ्या विद्यार्थी व्हिसा धारकांना कामाचे अधिकार देणे थांबवावे लागेल.

# दोन नेपाळी नागरिकांना अटक

## लेहमधील हिंसाचारादरम्यान पोलिसांवर केला होता हल्ला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लेहमधील हिंसाचारादरम्यान पोलिसांवर हल्ला केल्याच्या आरोपाखाली दोन नेपाळी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार या चकमकीत दोघांनाही गोळी लागली आहे. यामुळे आंदोलनात देशाबाहेरील लोकांच्या उपस्थितीबद्दल चिंता व्यक्त होत आहे. या हिंसाचाराप्रकरणी आतापर्यंत, जवळजवळ ६० जणांना अटक करण्यात आली आहे.**



टाईम्स नाऊने दिलेल्या वृत्तानुसार, पोलीस सूत्रांनी सांगितले की, हिंसाचारात चार नेपाळी नागरिक जखमी झाले आहेत, त्यापैकी दोघांना अटक करण्यात आली आहे, तर दोघांवर उपचार सुरू आहेत. यातून हिंसाचारात परदेशी लोकांचा सहभाग असल्याचे दिसून येते. अटक केलेल्यांना न्यायालयात हजर करण्यापूर्वी वैद्यकीय तपासणीसाठी एसएनएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तपास सुरू असताना आणखी काहींना अटक होण्याची शक्यता आहे.तत्पूर्वी, हवामान कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचीही लडाख आंदोलनाची तुलना नेपाळच्या 'जेन-झेड क्रांती'शी करण्याच्या त्यांच्या वादग्रस्त विधानाबद्दल चौकशी करण्यात आली आहे. बुधवारी त्यांचे उपोषण मागे घेताना, वांगचुक यांनी लेहमधील निदर्शने ही 'जेन-झेड क्रांती' होती व बेरोजगारी आणि त्यांचे लोकशाही हक्क हिरावले जात असल्याने तरुण संतप्त असल्याचे म्हटले होते.बुधवारी लेहमध्ये पोलिसांनी केलेल्या गोळीबारात चार जणांचा मृत्यू झाला होता.

### सोनम वांगचुक यांची चौकशी

किमान ५० जण जखमी झाले होते. आंदोलकांनी लेहमधील भाजपा कार्यालयालाही आग लावली होती. हिंसाचारानंतर, लडाखला राज्याचा दर्जा मिळावा या मागणीसाठी गेल्या ३५ दिवसांपासून उपोषण करणारे हवामान कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी त्यांचे उपोषण मागे घेतले होते. यानंतर लेह प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून जमावबंदीचे आदेश लागू केले होते.



# नवरात्रीचा सहावा दिवस कात्यायनी मातेला समर्पित!

शारदीय नवरात्रीचा सहावा दिवस. या दिवशी दुर्गा मातेचे सहावे रूप कात्यायनी देवीची पूजा करण्याची परंपरा आहे. असे म्हटले जाते की कात्यायनी मातेची पूजा केल्याने भक्तांना धन, धर्म, काम आणि मोक्ष सहज प्राप्त होतो. माता कात्यायनीचे रूप तेजस्वी आणि तेजस्वी आहे. त्यांना चार हात आहेत. उजव्या बाजूचा वरचा हात अभयमुद्रामध्ये राहतो. खालचा हात वराच्या मुद्रेत आहे. माता कात्यायनीने वरच्या डाव्या हातात तलवार धारण केली आहे आणि खालच्या हातात कमळाचे फूल आहे. धार्मिक श्रद्धेनुसार जो कोणी कात्यायनी देवीची पूर्ण भक्तिभावाने उपासना करतो. त्याला सर्वोच्च पदाची प्राप्ती होते. येथे जाणून घ्या माँ कात्यायनीची पूजा पद्धत, आरती, मंत्र आणि आवडते नैवेद्य...

## माँ कात्यायनीच्या पूजेची पद्धत

» नवरात्रीच्या सहाव्या दिवशी सकाळी स्नान करून देवीला गंगाजलाने स्नान करावे. नंतर देवी कात्यायनीचे ध्यान करा आणि तिच्यासमोर धूप दिवा लावा. आईला रोळीने टिळक लावा, अखंड अर्पण करा आणि तिची पूजा करा. या दिवशी कात्यायनी मातेला जास्वंद किंवा लाल रंगाची फुले अर्पण करावीत. शेवटी माँ कात्यायनीची आरती करून क्षमा मागावी.



## मां कात्यायनी प्रिय भोग

» या दिवशी कात्यायनी मातेच्या पूजेत मध अर्पण करावा. यामुळे देवी माता प्रसन्न होते आणि भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात. या देवी सर्वभूतेषु मां कात्यायनी ही संपूर्ण संस्था आहे.

नमस्तेस्ये नमस्तेस्ये नमस्तेस्ये नमो नमः ।
चंद्र हसोज्ज्वल्कारा शार्दुलावर वाहन.
कात्यायनी शुभंदाद्या देवी दैत्य घटिनी ।

पाकचा दणदणीत विजय

## पाकचा बांगलादेशवर दणदणीत विजय

# भारत- पाकिस्तान फायनलमध्ये भिडणार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेतील सुपर ४ फेरीतील महत्वाचा सामना पाकिस्तान आणि बांगलादेश या दोन्ही संघांमध्ये पार पडला. बुधवारी झालेल्या सामन्यात भारतीय संघाने बांगलादेशला पराभूत करून या स्पर्धेतील अंतिम फेरीत स्थान मिळवलं आहे. दरम्यान भारतीय संघाविरूद्ध कोण खेळणार याचा निर्णय या बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याच्या निकालावरून लागणार होता.**

## बांगलादेश फलंदाज फ्लॉप




या सामन्यात बांगलादेशला सहज विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश करण्याची संधी होती. पण बांगलादेशच्या फलंदाजांच्या फ्लॉप कामगिरीमुळे आणि पाकिस्तानच्या दमदार गोलंदाजीच्या बळावर पाकिस्तानने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. यासह पहिल्यांदाच भारत- पाकिस्तान हे दोन्ही संघ आशिया चषकातील अंतिम फेरीत भिडणार आहेत. या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या पाकिस्तानने १३५ धावा केल्या बांगलादेशला हा सामना जिंकण्यासाठी १३६ धावा करायच्या होत्या.हे आव्हान फार काही मोठं नव्हतं. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या बांगलादेशला पहिल्या षटकातील पाचव्या चेंडूवर मोठा धक्का बसला.सलामीवीर फलंदाज परवेज हुसेन शून्यावर माघारी परतला. तर गेल्या सामन्यात अर्धशतक झळकावणारा सैफ हुसेन अवघ्या १८ धावा करत माघारी परतला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला तोहिद हृदोय अवघ्या ५ धावांवर माघारी परतला. मेहदी हसनने ११, नुरूल हसनने १६, जाकेर अलीने ५ धावांची खेळी केली. बांगलादेशचा संघ विजयापासून ११ धावा दूर राहिला.या सामन्यात बांगलादेशचा कर्णधार लिटन दास खेळू शकला नव्हता. त्यामुळे पुन्हा एकदा संघाचं नेतृत्व करण्याची जबाबदारी जाकेर अलीकडे सोपवण्यात आली होती. बांगलादेशचा कर्णधाराने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय सार्थ ठरवला. प्रथम गोलंदाजी करताना बांगलादेशच्या गोलंदाजांनी पाकिस्तानला ८ गडी बाद अवघ्या १३५ धावांवर रोखलं.

पाकिस्तानचे या सामन्यात पूर्णपणे फ्लॉप ठरले. पाकिस्तानकडून सलामीला आलेला साहिबजादा फरहान अवघ्या ४ धावांवर तंबूत परतला. तर फखर जमानने १३ धावांची खेळी केली. सईम अयुब या डावातही फ्लॉप ठरला. तो शून्यावर बाद होऊन माघारी परतला. कर्णधार सलमान अली आगाने १९ धावांची खेळी केली. तर हुसेन हलत ३ धावांवर माघारी परतला. शेवटी मोहम्मद हरिसने ३१, शाहीन आफ्रिदीने १९, मोहम्मद नवाजने २५ धावांची खेळी करत संघाची धावसंख्या १३५ धावांवर पोहोचवली.या दमदार विजयासह पाकिस्तानने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. मुख्य बाब म्हणजे भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ पहिल्यांदाच आशिया चषकातील अंतिम फेरीत भिडणार आहेत. याआधी हे दोन्ही संघ या स्पर्धेत २ वेळेस आमनेसामने आले होते. या दोन्ही सामन्यांमध्ये भारतीय संघाने पाकिस्तानला धूळ चारली होती.

आता अंतिम फेरीत कोणता संघ बाजी मारणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.या सामन्यात बांगलादेशला सहज विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश करण्याची संधी होती. पण बांगलादेशच्या फलंदाजांच्या फ्लॉप कामगिरीमुळे आणि पाकिस्तानच्या दमदार गोलंदाजीच्या बळावर पाकिस्तानने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. यासह पहिल्यांदाच भारत- पाकिस्तान हे दोन्ही संघ आशिया चषकातील अंतिम फेरीत भिडणार आहेत. या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या पाकिस्तानने १३५ धावा केल्या बांगलादेशला हा सामना जिंकण्यासाठी १३६ धावा करायच्या होत्या.हे आव्हान फार काही मोठं नव्हतं. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या बांगलादेशला पहिल्या षटकातील पाचव्या चेंडूवर मोठा धक्का बसला.सलामीवीर फलंदाज परवेज हुसेन शून्यावर माघारी परतला.

### दास खेळू शकला नव्हता

सैफ हुसेन अवघ्या १८ धावा करत माघारी परतला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला तोहिद हृदोय अवघ्या ५ धावांवर माघारी परतला. मेहदी हसनने ११, नुरूल हसनने १६, जाकेर अलीने ५ धावांची खेळी केली. बांगलादेशचा संघ विजयापासून ११ धावा दूर राहिला.या सामन्यात बांगलादेशचा कर्णधार लिटन दास खेळू शकला नव्हता.

# बुमराह भारताच्या माजी खेळाडूवर वैतागला

## माजी खेळाडू  कैफने बुमराहबाबत एक्सवर पोस्ट शेअर केली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघ आशिया चषक २०२५ च्या अंतिम सामन्यात पोहोचला आहे. जसप्रीत बुमराहची आशिया चषकातील कामगिरी थोडी वरखाली राहिली आहे. बुमराहच्या वर्कलोड मॅनेजमेंटबाबतही बरीच चर्चा सुरू आहे. याशिवाय आशिया चषकानंतर लगेच होणाऱ्या कसोटी मालिकेसाठीही बुमराहची संघात निवड करण्यात आली आहे.**




रम्यान भारताचा माजी खेळाडू मोहम्मद कैफने बुमराहबाबत एक्सवर पोस्ट शेअर केली आहे. यावर बुमराहने उत्तर देत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. माजी भारतीय खेळाडू मोहम्मद कैफच्या ट्विटवरून उत्तर देत त्यांचं म्हणणं खोट असल्याचं बुमराहने म्हटलं आहे. कडक टीका केली आहे.एक्सवर कैफने बुमराहच्या गोलंदाजीच्या रणनीती आणि वर्कलोड व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बुमराहने यावर थेट उत्तर दिलं आहे.

आशिया चषकाच्या अंतिम सामन्यापूर्वी हा वाद चर्चेत आला आहे, जिथे भारत पाकिस्तान किंवा बांगलादेशशी भिडणार आहे. आशिया चषकात टीम इंडिया वेगळ्या रणनितीसह खेळत आहे. जसप्रीत बुमराह हा डेथ ओव्हर्स स्पेशालिस्ट मानला जातो. या स्पर्धेत तो त्याच्या चार पैकी तीन षटकं पॉवरप्लेमध्ये टाकत आहे, ज्यामुळे मोहम्मद कैफने पोस्ट शेअर करत यावर प्रश्न उभारला. मोहम्मद कैफने त्याच्या पोस्टमध्ये लिहिलं आहे की, रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली बुमराह शेवटच्या षटकांमध्ये जास्त गोलंदाजी करत असे.

पण, सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली असं होत नाहीये, जी फलंदाजांसाठी दिलासा देणारी बाब आहे.

### गोलंदाजी करण्याला प्राधान्य

कैफने पोस्टमध्ये म्हटलं, रोहितच्या नेतृत्वाखाली,१७ आणि १९ वी षटकं टाकत असे. सूर्याच्या नेतृत्वाखाली, त्याने आशिया चषकात पॉवरप्लेमध्ये तीन षटकं टाकली आहेत. दुखापत टाळण्यासाठी, बुमराह त्याचे शरीर उबदार ठेवून गोलंदाजी करण्याला प्राधान्य देत आहे. उर्वरित १४ षटकांमध्ये बुमराहचं एक षटक फलंदाजांसाठी मोठा दिलासा देणारं आहे.


स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार।
। दि. 26 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# इंद्रायणीनगरमध्ये कोण करणार विजयाचे ‘सीमोल्लंघन’!

## ग्राऊंड रिपोर्ट: सावळे-मडिगेरी-लांडे-लोंढे सहाणे-वाबळे यांच्यात चुरस

। पिंपरी चिंचवड । अविनाश आदक : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 ची प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाली. ऑक्टोबरमध्ये हरकती आणि सूचनांची सुनावणी होईल आणि सदरची प्रभाग रचना अंतिम केली जाणार आहे. त्यानंतर आरक्षण सोडत आणि निवडणूक आचारसंहिता सुरू होईल. ही निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडीतील घटकपक्ष स्वबळावर लढवतील, असे चित्र आहे. डिसेंबरमध्ये मतदान आणि जानेवारी-2026 मध्ये महानगरपालिकेत नवीन महापौर विराजमान होतील. या निमित्ताने “महाईन्यूज” च्या माध्यमातून प्रभागनिहाय राजकीय स्थितीबाबत विश्लेषण पहिला “ग्राऊंड रिपोर्ट” प्रसिद्ध करीत आहोत.**






2017 च्या निवडणुकीप्रमाणे प्रभाग “रचना जैसे थे” आहे. प्रभाग क्रमांक 8 मध्ये कोणताही बदल नाही. ज्याअर्थी 2017 प्रमाणे प्रभाग निश्चित झाले आहेत. त्यासाठी 2011 ची जनगनना ग्रहीत धरली आहे. तत्कालीन जनगननेनुसार, प्रभागाची लोकसंख्या 50 हजार 164 इतकी दर्शवण्यात आली आहे. त्यापैकी 7 हजार 191 इतकी अनुसूचित जाती आणि 1 हजार 90 इतकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे.

लोकसंख्येच्या प्रमाणानुसार, 2017 मध्ये शहरात भाजपाची मोठी लाट होती. या प्रभागातून भाजपाचे तीन नगरसेवक निवडून आले होते. प्रभागातील अ- गटातून भाजपाच्या तिकीटावर सीमा सावळे यांनी 9 हजार 806 मते मिळवत, राष्ट्रवादीच्या सविता झोंबाडे यांचा पराभव केला होता. महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर सीमा सावळे यांना पहिल्यांदा स्थायी समिती सभापतीपदी संधी देण्यात आली. त्यानंतरच्या काळात सावळे आणि भाजपाच्या स्थानिक नेत्यांमध्ये मतभेद निर्माण झाले. महापालिका प्रस्तावित निवडणूक 2022 मध्ये सावळे यांनी भाजपाविरोधात भूमिका घेतली. त्यानंतर 2024 च्या विधानसभा निवडणुकीत सावळे यांनी पिंपरी विधानसभेतून जोरदार तयारी केली होती. मात्र, त्यांना प्रस्थापित पक्षांकडून तिकीट मिळाले नाही.

प्रभागातील ब- गटातून भाजपाच्या नम्रता लोंढे यांनी 10 हजार 642 मते मिळवत, राष्ट्रवादीच्या सोनाली उदावंत यांचा पराभव केला होता. तसेच, क-गटातून भाजपाच्या विलास मडिगेरी यांनी 9 हजार 358 मते घेतली आणि राष्ट्रवादीच्या संजय वाबळे यांचा पराभव केला होता. भारतीय जनता पार्टीकडून मडिगेरी यांना पक्षाचा निष्ठावंत म्हणून स्थायी समिती सभापतीपदी संधी देण्यात आली होती.

माजी आमदार विलास लांडे यांचे चिरंजीव विक्रात लांडे यांनीही याच प्रभागातून निवडणूक लढवली होती. भाजपाकडून सारंग कामतेकर यांच्या विरोधात 7 हजार 933 मते मिळवत विक्रांत लांडे यांनी ‘घड्याळ’ चिन्हावर निवडणूक लढवली होती. 2024 च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी अजित गव्हाणे यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षामध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर पुन्हा त्यांनी अजित पवार गटात सहभाग घेतला आहे. याच गटातून विद्यमान आमदार महेश लांडगे यांचे तत्कालीन समर्थक तुषार सहाणे यांनी ‘धनुष्यबाण’ चिन्हावर निवडणूक लढवली होती. त्यांना 7 हजार 586 मते मिळाली आहेत. अवघ्या 347 मतांनी सहाणे यांचा पराभव झाला आहे. सहाणे सध्या शिवसेना ठाकरे गटात आहेत.

2017 च्या निवडणुकीत अ- अनुसूचित जाती महिला, ब- नागरिकांचा मागास प्रवर्ग, क- सर्वसाधारण आणि ड- सर्वसाधारण असे आरक्षण होते. या प्रभागात बालाजीनगर, खंडेवस्ती, गवळीमाथा झोपडपट्टीचा परिसर आणि सोसायटीधारक असा संमिश्र मतदार आहे.



“ गेल्या तीन टर्म आम्ही लोकांसाठी काम करीत आहोत. लोकांचा संपर्क आणि केलेली कामे याच्या जोरावर मी आणि माझे पॅनेल निर्विवादपणे निवडून येईल. ‘एक कॉल प्रॉब्लेम सॉल्व्ह’ या संकल्पनेतून प्रभागातील समस्या सोडवण्यासाठी आम्ही सातत्त्याने प्रयत्न केले आहेत. लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आहे. मी कोणत्याही पक्षात प्रवेश केलेला नाही. मधल्या काळात काही मतभेद झाले असतील, पण मी आहे तिथेच आहे. आम्ही लढू आणि जिंकू..!

–**सीमा सावळे,** माजी नगरसेवक



“ राज्याचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्त्वामध्ये शहराचा आणि माझ्या प्रभागाचाही विकास झाला. प्रभागातील विविध विकासकामे आम्ही मार्गी लावली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची प्रभागात तुल्यबळ ताकद आहे. सर्वसामान्य व सुशिक्षित नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी आम्ही सर्वोतोपरी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे आमचे चारही नगरसेवक निवडून येतील.

–**विक्रांत लांडे,** माजी नगरसेवक.



“ गेली 20 वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. 2017 च्या निवडणुकीमध्ये प्रस्थापित उमेदवाराला निवडून आणण्यासाठी तुषार सहाणे यांचा ‘बळीचा बकरा बनवला” अशी भावना सहाणे समर्थक आणि नागरिकांमध्ये आहे. सत्तेत नसतानाही मी लोकांच्या संपर्कात आहे. लोकांची कामे करीत आलो आहे. त्यामुळे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची साथ आहे. माझे पॅनेल बहुमताने निवडून येईल.

– **तुषार सहाणे,** इच्छुक उमेदवार.

### पक्षनिहाय इच्छुकांची नावे :

1. **भारतीय जनता पार्टी :** सीमा सावळे, विलास मडिगेरी, नम्रता लोंढे, हनुमंत लांडगे, योगेश लोंढे, शिवराज लांडगे, निलम लांडगे, निखिल काळकुटे, आदी.
2. **राष्ट्रवादी अ.प. गट :** विक्रांत लांडे, संजय वाबळे, राजश्री घागरे, सविता झोंबाडे, विजय लोखंडे आदी.
3. **शिवसेना शिंदे गट :** निलेश मुटके.
4. **राष्ट्रवादी श.प. गट :** अद्याप कोणी नाही.
5. **शिवसेना उबाठा गट :** तुषार सहाणे.
6. **भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :** आझर खान.

### प्रभागातील समाविष्ट भाग :

जय गणेश साम्राज्य, जलवायु विहार, केंद्रीय विहार, महाराष्ट्र कॉलनी, इंद्रायणीनगर, खंडेवस्ती, गवळीमाथा, बालाजीनगर आदी.

### 2017 मधील विजयी उमेदवार :

2017 मधील विजयी उमेदवार :
अ - सीमा सावळे - भाजपा
ब - नम्रता लोंढे - भाजपा
क- विलास मडिगेरी - भाजपा
ड - विक्रांत लांडे - राष्ट्रवादी (अ.प.)

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार।
। दि. 26 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## आळंदी वडगाव रोडवरील

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर!

### पालक, शिक्षक यांची नगरपालिका आणि वाहतूक विभागाला मागणी

। आळंदी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**येथील वडगाव रोडवरील प्रियदर्शनी शाळेसमोरचा रस्ता अत्यंत खराब स्थितीत असून, दररोज शेकडो विद्यार्थी जीव मुठीत धरून शाळेत ये-जा करत आहेत. पालक आणि शिक्षकांनी या परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत नगरपालिका आणि वाहतूक विभागाने तातडीने या बाबत योग्य उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.**



या रस्त्यावर मोठमोठे खड्डे असून, त्यामुळे वाहनधारकांसह चालणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही प्रवास अत्यंत धोकादायक बनला आहे. याशिवाय, फूटपाथवर कचऱ्याचे ढीग असून, अनेकजण गाडीतून जाताना रस्त्यावरच कचरा टाकतात. त्यामुळे दुर्गंधी व अस्वच्छता निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.या रस्त्यावर जड वाहनांची वाहतूक बंदी असतानाही ट्रक, डंपर यासारखी वाहने खुलेआम फिरत आहेत. शिवाय अनेक चालक वेगात व बेदरकारपणे वाहन चालवत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. याकडे ना महापालिकेचे अधिकारी लक्ष देत आहेत, ना वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे, अशी तक्रार शिक्षक आणि पालकांनी केली.

आळंदी, वडगाव रोडवरील शाळा, महाविद्यालयांच्या वेळेत बुलेट रायडर्स मोठा आवाज करत ये-जा करतात. त्यामुळे वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होते, परीक्षेच्या तयारीवर परिणाम होतो आणि रस्त्यावरून जाणारे नागरिक दचकतात. मोटार वाहन कायद्यानुसार दुचाकीमध्ये कंपनीकडून बसवलेला सायलेन्सर वापरणे बंधनकारक आहे. मात्र, काही रायडर्स बुलेटसोबत असलेला कमी आवाज करणारा मूळ सायलेन्सर काढून गोळीबारासारखा मोठा आवाज करणारे बदललेले सायलेन्सर बसवतात. त्यामुळे त्यांच्या बुलेटमधून निघणारा आवाज थेट गोळीबारासारखा वाटतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिला या आवाजामुळे घाबरतात. शाळा परिसरात विद्यार्थ्यांना त्रास होतो.

विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासनाने गंभीरतेने लक्ष घालून बुलेटच्या फटफटीला आळा घालणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत तक्रारी करुनही कोणतीही प्रशासकीय यंत्रणा याकडे लक्ष देत नाही. असाही आरोप केला जात आहे.

> “ आमच्या मुलांना सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण हवे आहे. रस्ता दुरुस्त करा, कचरा हटवा आणि अवजड वाहनांवर नियंत्रण ठेवा.
>
> **-अश्विनी वायदंडे,**
> शिक्षिका, प्रियदर्शनी स्कुल आळंदी



> “ "हे फक्त शाळेपुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण परिसराच्या आरोग्याचा व सुरक्षेचा प्रश्न आहे. महापालिकेने आणि वाहतूक विभागाने संयुक्तरित्या कारवाई करून हे प्रश्न कायमचे सोडवावे."
>
> **-माधुरी बोंद्रे,**
> शिक्षिका, प्रियदर्शनी स्कुल आळंदी



---

# आर्यन पाडुळे यांची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

### शिक्षण विश्व : न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा!

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यू इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी आर्यन संपत पाडुळे याने ८० किलो वजनी गटात कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत संपूर्ण शाळेचे नाव उज्वल केले आहे. या शानदार कामगिरीमुळे त्याची अहिल्यानगर, श्रीगोंदा येथे होणाऱ्या विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**




आर्यन हा कावेरी नगर कुस्ती संकुल येथे नियमित सराव करत असून, शाळेतील शिक्षकांचे त्याला मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याची मेहनत, सातत्य आणि शिस्तबद्ध सराव यामुळेच तो या यशाचा मानकरी ठरला आहे.

या यशाबद्दल शाळेतील सर्व शिक्षक, पालक आणि व्यवस्थापनाने आर्यनचे अभिनंदन केले आहे. संस्थेचे अध्यक्ष विजय पवार, सचिव अशोक मोरे, खजिनदार सुरेखा पवार, मुख्याध्यापिका विद्या नाईक यांनी आर्यनला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. हा क्षण शाळेसाठी गौरवाचा असून, आर्यनसारख्या विद्यार्थ्यांमुळे इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते असे मुख्याध्यापिका विद्या नाईक म्हणाल्या.

# रंगात रंगुनी... रंग आमचा पिवळा...



भोसरी येथील प्रथित यश आदर्श शिक्षण संस्थेच्या शिक्षकांनी नवरात्र उत्सव साजरा केला.



प्रियदर्शिनी स्कूल, आळंदी येथे नवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला.

## अण्णासाहेब पाटील यांचे कार्यदीप स्तंभा सारखे

# नव्या पिढीसाठी अण्णासाहेब पाटील आजही आदर्श - इरफान सय्यद

### अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना प्रणित महाराष्ट्र मजदूर संघटनेचे अभिवादन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वर्गीय आमदार अण्णासाहेब पाटील यांचे कार्यदीप स्तंभा सारखे आहे. माथाडी कामगारांच्या आयुष्यात त्यांच्या संघर्षामुळे नवी पहाट निर्माण झाली. त्यांचे कार्य आजही नव्या पिढीसाठी आदर्श आहे असे मत शिवसेनेचे उपनेते इरफान सय्यद यांनी व्यक्त केले.**



अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक आणि माथाडी कामगार चळवळीचे प्रणेते स्वर्गीय आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना प्रणित महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या वतीने त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले

या निमित्त चिंचवड येथील के एस बी चौकातील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या प्रसंगी शिवसेनेचे उपनेते इरफान सय्यद यांनी आपल्या भाषणात सांगितले की स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे माथाडी कामगारांना हक्काचे स्थान प्राप्त झाले त्यांचे जीवनकार्य हे आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून कामगार चळवळीला दिशा देणारे आहे.

कार्यक्रमात महाराष्ट्र मजदूर संघटनेचे उपाध्यक्ष भिवाजी वाटेकर, कार्याध्यक्ष परेश मोरे,जनरल सेक्रेटरी प्रविण जाधव तसेच पांडुरंग कदम, पांडुरंग काळोखे, सर्जेराव कचरे, पांडुरंग पठारे, अशोक साळुंखे, सतीश कंटाळे, गोरक्ष दुबाले, समर्थ नाईकवाडे, नागेश व्हनवटे, मनोज मंजाळ, अमित पासलकर, बबन काळे, दादा कदम, उद्धव सरोदे, माऊली पाचपुते, श्रीकांत मोरे, भारत मंजाळ, काळोखे मामा, विश्वनाथ गांगड, नाना नाईकवाडे, विजय खंडागळे, गिरीश देशमुख, रतन भोजने, आयुष शिंदे, गणेश नाइकवाडे, भरत मंजाळ आदी पदाधिकारी विविध माथाडी टोळ्यांचे मुकादम आणि मोठ्या संख्येने सभासद कामगार उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांच्या कार्याचा जागर करण्यात आला आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प करण्यात आला

# पुण्यात जागतिक दर्जाचे वसतीगृह बांधणार!

### चकोर गांधी : सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्टच्या जागेबाबत स्पष्टीकरण

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील मॉडल कॉलनीतील सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्टच्या जागेवरील वसतीगृहाबाबत चकोर गांधी आणि ट्रस्टींनी स्पष्टीकरण दिले आहे. वसतिगृहाची जागा खासगी विकासकाला देणं अयोग्य असल्याच्या वृत्तांवर भूमिका स्पष्ट करतानाच अशा व्हायरल झालेल्या पोस्ट अथवा बातम्यांवर कोणीही विश्वास ठेवू नये असे आवाहनही ट्रस्टने केले आहे.**



दिगंबर जैन समाजात मी कार्य केले असून आज मी पुण्यातील ट्रस्टच्या वसतिगृहाबाबत सत्य तुम्हा सर्वांसमोर मांडू इच्छितो असे सांगत चकोर गांधी पुढे म्हणाले, जैन समाजाची मुलं जी पुण्यात शिकायला येतात त्यांच्या राहण्याची व्यवस्था व्हावी यासाठी 1962- 63 च्या सुमारास हे वसतिगृह बांधण्यात आले होते. तेव्हापासून आत्तापर्यंत एकाच कुटुंबाचे सदस्य या ट्रस्टचे अध्यक्ष होते. याशिवाय आमच्या तीन पिढ्यांनी ट्रस्टमध्ये काम केले आहे. मी देखील या ट्रस्टमध्ये 45 वर्षांपासून काम करतोय. या वसतिगृहात राहून गेलेली विद्यार्थी आज करिअरमध्ये यशस्वी आहेत. या ट्रस्टमध्ये कोणाच्याही देणगी नाहीत. या ट्रस्टचा समाजाला फायदा झाला असली तरी ही जागा समाजाची नाही. हे कार्य पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचं आहे.

वसतिगृहाची इमारत 62- 65 वर्षांची असून इमारतीची अवस्था बिकट आहे. यासाठीच इमारतीच्या पुनर्विकासाची चर्चा सुरू होती. यात मंदिर तसंच ठेवून वसतिगृह नव्याने बांधले जाणार आहे. यात जागतिक दर्जाचे वसतिगृह असेल, असं चकोर गांधींनी सांगितले.

**सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्टने काय म्हटले आहे?**

1.ट्रस्टची स्थापना सन 1958 मध्ये शिक्षण, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय, धर्मशाळा, आरोग्यवर्धक केंद्र, गरीबांसाठी वैद्यकीय सहाय्य आणि इतर परोपकारी उद्देशांच्या प्रगतीसाठी करण्यात आली.

2. सेठ हिराचंद नेमचंद स्मारक ट्रस्टने सदर मालमत्ता 29.07.1958 रोजीच्या विक्री करारनाम्याद्वारे विकत घेतली असून त्या मालमत्तेचा तो पूर्ण मालक आहे.

3. ही मालमत्ता कोणत्याही बाहेरील व्यक्तीने ट्रस्टला दान केलेली नाही किंवा ती ट्रस्टने परोपकारी उद्देशाने विकत घेतलेली आहे.

4. ट्रस्टने सुमारे 60 वर्षांपूर्वी गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची इमारत बांधली होती. इमारत जुनी झाल्यामुळे संपूर्ण जमिन विकण्याचा निर्णय विश्वस्तांनी घेतला. त्यासाठी 16-12-2024 रोजी विश्वस्त मंडळाची बैठक बोलावण्यात आली व सदर मालमत्तेच्या संभाव्य विक्रीवर चर्चा झाली.

5. सार्वजनिक सूचना 20-12-2024 रोजी 'बिझनेस स्टँडर्ड' (इंग्रजी, मुंबई), 'दैनिक पुढारी' (मराठी, मुंबई), 'फायनान्शियल एक्सप्रेस' (इंग्रजी, पुणे) आणि 'दैनिक प्रभात' (मराठी, पुणे) या वृत्तपत्रांत प्रसिद्ध केली.

> सध्या वसतिगृहाबाबत सोशल मीडियावर काही चुकीच्या गोष्टी व्हायरल होत आहे. या संस्थेबाबत ज्या गोष्टी व्हायरल होत आहे त्यात कोणतेही तथ्य नाही. यातून विनाकारण गैरसमज निर्माण केले जात आहे. वसतिगृहाच्या विश्वस्त मंडळाने विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक सोयीसुविधा असलेले निवासस्थान उपलब्ध व्हावे यासाठी पुनर्विकासाचा निर्णय घेतला. यात विश्वस्तांनी वसतिगृह आणि मंदिर आहे त्याच जागी राहिल याची काळजी घेतली आहे. विश्वस्तांनी वारंवार समाजासमोर वारंवार भूमिका स्पष्ट केली आहे. 11 जानेवारी 2025 रोजी झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात आणि एप्रिलमधील महावीर जयंतीलाही याची माहिती देण्यात आली होती. ही स्पष्ट परिस्थिती असतानाही समाजात संस्थेची नाहक बदनामी करण्याचा तर प्रयत्न नाही ना याचा विचार सर्वांनी करावा. व्हायरल बातमीवर विश्वास ठेवू नका अशी विनंती मी सर्वांना करत आहे.
>
> – **सुरेंद्र गांधी,** अधीक्षक, वसतिगृह.

6. गोखले लँडमार्कस् एल. एल. पी. ने सर्वाधिक बोली लावत रोख स्वरूपात तसेच बांधकामाच्या स्वरूपात सर्वोत्तम ऑफर दिली.

7. ट्रस्टने बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्टच्या कलम 36 अंतर्गत मुंबई येथील चॅरिटी कमिशनरांकडे अर्ज दाखल केला. न्यायालयाने ठराविक अटींसह अर्ज मंजूर केला. ट्रस्टने योग्य कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली असून सदर मालमत्ता गोखले लँडमार्कस् एल. एल. पी. कडे हस्तांतरित करण्यात आली आहे.

8. मा. चॅरिटी कमिशनर, मुंबई यांनी अर्ज क्र. CC/24/2025 वर दिनांक 04.04.2025 रोजी आदेश देऊन ट्रस्टला मालमत्ता विक्रीस परवानगी दिली आहे.

# मास्टर माईंड ग्लोबल स्कूलमध्ये

# नवरात्रोत्सवाचा चौथा दिवस उत्साहात साजरा!







**।पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये शारदीय नवरात्रोत्सवाचा चौथा दिवस मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात साजरा करण्यात आला. नवरात्राची चौथी माळ असल्याने या दिवशी विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी पिवळ्या रंगाचे कपडे परिधान करून देवीची पूजा-अर्चा केली.**

पिवळा रंग हा आनंद, ऊर्जा, सकारात्मकता आणि ज्ञान यांचे प्रतीक मानला जातो. या दिवशी पिवळ्या वस्त्रांचा स्वीकार केल्याने आध्यात्मिक उर्जा वाढते, मनात आशावाद निर्माण होतो आणि उत्साहाला नवे बळ मिळते. तसेच हा रंग माता दुर्गेच्या कृपेचे आणि बुद्धीच्या प्रकाशाचे प्रतीक असल्याने तो शुभ व मंगल मानला जातो. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भजन, स्तोत्र पठण आणि आरती करून देवीची आराधना केली. शाळेत वातावरण भक्तिमय आणि उत्साहवर्धक बनले होते. नवरात्रोत्सवाचे हे पर्व विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता, भक्तिभाव आणि सांस्कृतिक जाणीव रुजवणारे ठरले.


Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549